बोरी येथे मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर >>पान 2

पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा बिबी येथे ठिकठिकाणी सत्कार सोहळा संपन्न >>पान 3

ह्युमन मेटान्यूमो व्हायरस संदर्भात मार्गदर्शक सूचना जाहीर >>पान 4

**सुविचार**

विनम्रता आणि अहंकार हे एकत्र कधीच राहू शकत नाहीत.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




'इमरजन्सी'चा नवा ट्रेलर रिलीज ! हा मराठी अभिनेता करतोय काम

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 146 ■ मंगळवार, दि. 07 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## पारधी समाजाच्या २ गटात हाणामारी, जीव जाईपर्यंत मारलं, तिघांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी** : राज्यात गुन्हेगारीने कळस गाठला असून दिवसाढवळा हत्या, जीव जाईपर्यंत मारहाण, लैंगिक अत्याचार, बंदुकीचा धाक दाखवत दहशत, अपहरण अशा अनेक घटनांचं म राठवाडा केंद्रस्थान बनला आहे. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. पारधी समाजाच्या दोन गटात झालेल्या हाणामारीत चौघांचा मृत्यू झाला आहे. शेतात पाणी देण्यावरून झालेल्या वादातून ही घटना घडली असून जीव जाईपर्यंत मारल्याने चार जणांचा मृत्यू झाला असून यात ३ पुरुष आणि एका महिलेचा सहभाग आहे. मध्यरात्री घडलेल्या या घटनेनंतर येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून १० आरोपींना संशयित म्हणून पोलिसांनी ताब्यात घेतलंय.

पारधी समाजाच्या दोन गटात तुंबळ हाणामारी

धाराशिवमधील वाशी तालुक्यातील बावी पेढीवरील ही घटना असून मध्यरात्री शेतात पाणी देण्याच्या वादातून दोन्ही गटात प्रचंड मारहाण झाली. या हाणामारीत जीव जाईपर्यंत एकमेकांना मारल्याने चार जणांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत संशयितांना ताब्यात घेतलं आहे.

येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

या घटनेनंतर धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून येरमाळा पोलिसांनी दहा आरोपींना संशयित म्हणून ताब्यात घेतलं आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू असून वाशी तालुक्यातील बावी वस्तीतील या घटनेने तणावाचे वातावरण होते.

आळंदीत नराधमाचं घाणेरडं कृत्य

पाहूणा म्हणून आलेल्या २८ वर्षीय तरुणाने आळंदीतील शैक्षणिक संस्थेत १२ वर्षाच्या दोन मुलांवर अनैसर्गिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शनिवारी मध्यरात्री घडलेल्या या घटनेनंतर मोठी खळबळ उडाली असून आळंदीसह संपूर्ण परिसर हादरलाय. पुण्यातील आळंदी हद्दीतील वडगाव रस्त्याला असलेल्या एका शैक्षणिक संस्थेत हा प्रकार घडला असून या प्रकरणी तरुणास अटक करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास सुरु आहे.

महिला बकऱ्या चारण्याकरीता गेली असताना अत्याचार

अधिकची माहिती अशी की, वाशिमच्या कारंजा तालुक्यातील खेर्डा जिरापुरे शेत शिवारात ३५ वर्षीय महिला बकऱ्या चारण्याकरीता जंगलात गेली होती. दरम्यान, अज्ञात व्यक्तीने धार शस्त्राने मानेवर वार करून हत्या केल्याची घटना दोन दिवसा पूर्वी घडली होती...याप्रकरणी कारंजा पोलिसांनी तपासचक्र फिरवत गावातील रहीवासी संदिप गायकवाड हा व्यक्ती घटना घडल्यापासून बेपत्ता असल्याचं लक्षात येताच पोलिसांनी या आरोपीचा शोध सुरू केला.

## संतोष देशमुख हत्येप्रकरणी राज्यपालांनी हस्तक्षेप करून मुंडेंचा राजीनामा घ्यावा, सर्वपक्षीय शिष्टमंडळाची राज्यपालांकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळाने सोमवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतलीय. संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या आणि सुरू असलेल्या खंडणीखोरीच्या कारवायांमुळे बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अस्तित्वात राहिलेली नाही, असा आरोप शिष्टमंडळाने केलाय. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होण्याची शक्यता लक्षात घेऊन मंत्री धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा तातडीने राजीनामा घेण्यात यावा, अशी प्रमुख मागणी यावेळी शिष्टमंडळाने राज्यपालांकडे केलीय.

या प्रकरणात पक्षपातपणा होत असल्याचा संशय : माजी खासदार संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखाली राज्यपालांना भेटलेल्या या सर्वपक्षीय शिष्टमंडळात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार बजरंग सोनावणे, आमदार सुरेश धस, आ. जितेंद्र आव्हाड, आ. संदीप क्षीरसागर, ज्योती मेटे यांचा समावेश होता. या प्रकरणात पक्षपातपणा होत असल्याचा संशय असल्याने आणि आरोपींना राज्य सरकारकडून कथित पाठिंबा मिळत असल्याने नागरिकांचा विश्वास उडालाय, त्यामुळे राज्यपालांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आलीय.

शिष्टमंडळाच्या मागण्या काय? : ''कायद्याचे राज्य'' ही भावना दृढ होण्यासाठी अपहरण, खंडणी आणि खून प्रकरणाचा सूत्रधार वाल्मिकी कराड याच्याविरुद्ध बीएनएस १०३ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करून खटला जलदगती न्यायालयात चालवावा. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी सुनिश्चित करून कर्तव्यात कुचराई करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. बीडमधील रहिवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करावी आणि खंडणी आणि गुंडगिरीला आळा घालण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा मागण्या शिष्टमंडळानं केल्यात.

# नांदणी येथील जैन मठास तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांना सकल जैन समाज आणि नांदणी मठाच्यावतीने 'प्रजागर्क' पदवी



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी : रनांदणी येथील स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठाला लवकरच तीर्थक्षेत्र 'अ' दर्जा देवून मठासाठी आवश्यक सोयीसुविधा देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मठातील आयोजित पंचकल्याण प्रतिष्ठा महामस्तकाभिषेक महोत्सव सोहळ्यात श्री. फडणवीस बोलत होते.**




कोल्हापूर जिल्ह्यात पहिल्यांदाच येत असताना मला आनंद होत असून जैन समाजातील ऐतिहासिक व सर्वात मोठ्या कार्यक्रमास उपस्थित राहता आले. नागपूर येथे जैन ट्रेड ऑर्गनायझेशन कार्यक्रमात जैन समाजातील वेगळे स्वरूप पाहता आले. आज पुन्हा याच समाजाचे आगळेवेगळे स्वरूप पाहायला मिळाले. जैन समाजातील व्यवसाय आणि व्यापारात देशासाठी योगदान देणारे लोक नागपूर येथे भेटले आणि आज कोल्हापूर जिल्ह्यात काळ्या आईची सेवा करणारे शेतकरी लोक भेटले, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार सर्वश्री डॉ.राजेंद्र पाटील – यड्रावकर, राहुल आवाडे, अमल महाडिक, अशोक माने, शिवाजी पाटील, माजी मंत्री सुरेश खाडे, माजी खासदार निवेदिता माने, माजी खासदार राजू शेट्टी, माजी आमदार प्रकाश आवाडे, जैन समाजातील आचार्य विशुद्ध सागर महाराज, मठाधिपती, १० आचार्य महाराज, ७ मुनी महाराज उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते वस्तुत्व महाकाव्य ग्रंथाच्या प्रतिकृतीचे प्रकाशन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सकल जैन समाज आणि स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठाच्यावतीने 'प्रजागर्क' पदवी देण्यात आली.

नांदणी मठात एक वेगळं जीन शासन पाहायला मिळत असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आचार्यांचे आशीर्वाद आणि सर्व भाविकांच्या दर्शनाचा लाभ यासाठी कार्यक्रमाला येण्याचे ठरवले. जैन तत्त्व 'जगा आणि जगू द्या' अशी आहेत. जगामध्ये बरेच विचार आले आणि नष्ट झाले. परंतु जैन विचार अजूनही शाश्र्वत आहेत. 'जन्माला आलाय तो जगेल आणि समाज त्याला जगवेल' असा विचार जैन समाजाचा आहे. सर्वाधिक समाजसेवा करणारा जैन समाज असून समाजाने सर्व क्षेत्रात प्रगती केली आहे. संपूर्ण जीवसृष्टी वाचविण्याचे विचार जैन विचारात आढळून येतात. समाजाला सशक्त आणि सन्मार्गावर ठेवणे हे मोठे काम आचार्य करतात. जैन समाजातील आचार्य, तीर्थंकार यांनी परंपरा आणि विचार आजही जीवित ठेवले आहेत. हेच संस्कार काल आणि स्थान यांचा विचार करीत नव्या स्वरूपात नव्या रूपाने समाजापर्यंत पोहचवले जातात.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, धर्मशास्त्र कधीच राजशक्तीवर अवलंबून राहिले नाही. परंतु धर्मसत्तेच्या विकासाच्या यात्रेमध्ये राजसत्ता निश्र्चितच प्रयत्न करेल. देशातील पहिले जैन महामंडळ राज्यात स्थापन केले आहे. महामंडळाच्या सुधारणांबाबत आलेल्या सूचनांचा विचार करून युवकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी महामंडळ अधिक बळकट करू. नांदणी मठात मिळालेल्या मानपत्राला पात्र होण्याचा प्रयत्न करू, असे आश्र्वासनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

### अलमट्टीबाबत गरज पडल्यास सर्वोच्च न्यायालयात जावू

स्थानिक आमदार यांनी शिरोळ तालुक्यातील पूर नियंत्रणाबाबत ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली. यावर मुख्यमंत्री म्हणाले, अलमट्टीबाबत सरकार लक्ष ठेवून आहे. त्यासाठी समितीही स्थापन करण्यात आली आहे. समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे. शासनाचा प्रयत्न पूरस्थिती नियंत्रणात आणण्याचा आहे. त्यासाठी आवश्यकता पडल्यास सर्वोच्च न्यायालयात जावू असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

### धक्कादायक! वाघाचे दोन तुकडे करुन जंगलात फेकले; वन विभागाचे अधिकारी तत्काळ धावले

**भंडारा /प्रतिनिधी** :धाराशिवच्या पायथ्याला गेल्या काही दिवसांपूर्वी वाघाचे दर्शन झाल्याने येथील भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मात्र, देशातील वाघांची संख्या आणि त्यांचे महत्त्व या दोन्ही बाबींचा विचार लक्षात घेता वाघाला पकडण्याची परवानगी सहजासहजी वन विभागाकडून देण्यात येत नाही. विशेष म्हणजे नरभक्षक वाघाला ठार करण्याचीही परवानगी सरकारकडून दिली जात नाही. त्यासाठी, न्यायालयाकडून विशेष परवानगी घ्यावी लागते. मात्र, विदर्भातील जंगल परसरात गेल्या १० दिवसांत दोन वाघांची शिकार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ८ दिवसांपूर्वी तुमसर येथे एक वाघ मृतावस्थेत आढळून आला होता. त्यानंतर, भंडाऱ्यात आज सकाळी एका वाघाचे दोन तुकडे करुन त्याची शिकार केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. याबाबत माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

वाघाची शिकार करून त्याचे दोन तुकडे करून जंगलात फ ेकल्याची धक्कादायक बाब भंडारा जिल्ह्यातील तुमसर वन विभागाच्या हद्दीतील झंझेरीया बिटात आज उघडकीस आली. विजेच्या प्रवाहानं या वाघाची शिकार करून दोन तुकडे केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

## लोकायुक्तांकडून राज्यपालांना अहवाल सादर

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याचे लोक आयुक्त न्या. वि. मु. कानडे (नि.) व उप लोक आयुक्त संजय भाटिया यांनी सोमवारी (दि. ६) राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन, मुंबई येथे भेट घेऊन त्यांना आपल्या कामकाजासंबंधीचा ५१ वा वार्षिक एकत्रित अहवाल सादर केला.

लोकायुक्त कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार २०२३ या अहवालाधीन वर्षात लोकायुक्त कार्यालयाकडे ४ हजार ७९० नवीन तक्रारी नोंदविण्यात आल्या. वर्षाच्या सुरुवातीला ४ हजार ५८३ प्रकरणे प्रलंबित होती. अशा प्रकारे सन २०२३ मध्ये ९ हजार ३७३ प्रकरणे कार्यवाहीकरिता उपलब्ध झाली.

नोंदणी केलेली ४ हजार ५५५ प्रकरणे अहवालाधीन वर्षात निकाली काढण्यात आली आणि सन २०२३ च्या वर्षअखेरीस ४ हजार ८१८ प्रकरणे प्रलंबित राहिली, असे लोकायुक्त कार्यालयाकडून यावेळी कळविण्यात आले. महाराष्ट्रातील लोक आयुक्त संस्थेने गेल्या पाच दशकांमध्ये अनेक तक्रारदारांची गाऱ्हाणी दूर केली असून गेल्या काही वर्षात ७५ टक्के पेक्षा जास्त तक्रारींमधील तक्रारदारांच्या गा– ऱ्हाण्यांचे निवारण करण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले.

### संतोष देशमुख प्रकरणी शरद पवारांचे मुख्यमंत्र्यां निवेदन; बजरंग सोनवणे, संदीप क्षीरसागरसह सुरेश धसांना सुरक्षा देण्याची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी** : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची महिनाभरापूर्वी काही गुंडांनी निर्घृण हत्या केली. या क्रूर घटनेला भला मोठा काळ उलटून गेला असला तरी देशमुख यांचे म ारेकरी अद्याप मोकाटच असल्याची जनभावना आहे. त्यामुळे, या संपूर्ण घटनेला फार मोठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे निदर्शनास येते. बीड– परळी भागात यापूर्वी देखील माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे या गुंड प्रवृत्तीची पाळेमूळे खणून काढण्याची राज्यभरातील अनेक लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे आणि त्यासाठी ते सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा करत आहेत.

असे असताना याच गुंडांपासून या लोकप्रतिनिधींच्या जीवाला धोका निर्माण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी याचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर लोकप्रतिनिधींच्या व इतर नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेत त्यांना राज्य शासनामार्फत योग्य ते पोलीस संरक्षण पुरवावे, अशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मागणी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे ही मागणी करण्यात आली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा अर्थात मकोका अंतर्गत कारवाई करण्याच्या हालचाली सीआयडीने सुरु केल्याची माहिती समोर आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड, सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांच्यासह इतरही आरोपींवर या आधी अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. यातील अनेक गुन्हे या आरोपींनी एकत्रितपणे कट रचुन केल्याचे दिसून येत असल्याने सीआयडीकडून या टोळीवर मकोका कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसे घडल्यास वाल्मिक कराडच्या अडचणीत मोठी वाढ होऊ शकते. त्यामुळे संतोष देशमुख हत्याप्रकरणात पुढे काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पांना गती द्यावी- गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध होण्यासाठी योजना राबविण्यात येतात. प्रत्यक्ष लाभार्थींपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी गृहनिर्माण प्रकल्पांना गती द्यावी. प्रकल्पांची कामे तातडीने सुरू करावीत असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

गृहनिर्माण विभागाची आढावा बैठक मंत्रालयात झाली.



गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले, सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळातर्फे (महा हाऊसिंग), म्हाडाच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे स्वतःचे घराचे स्वप्न साकार होत आहे. मुंबई शहर आणि परिसराचा झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे घरांची मागणीही वाढत आहे. राज्यातील प्रगतीपथावरील गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी यंत्रणांनी कामांची गती वाढवावी.

ज्येष्ठ नागरिक धोरण २०२४, प्रधानमंत्री आवास योजना, गिरणी कामगारांना घरे, सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना, धोकादायक इमारतींचा पुनर्विकास या विषयावरही यावेळी चर्चा करण्यात आली.

या बैठकीस गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह,धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर्. श्रीनिवास, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

## सर्रास नागरी वस्तीत दिसू लागले बिबटे..

पूर्वी क्वचितच नजरेस पडणारे बिबटे आता सर्रास नागरी वस्तीत दिसू लागले आहेत. दररोज कुठे ना कुठे बिबट्याने घुसखोरी केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. पूर्वी फक्त ग्रामीण भागात दिसणारे बिबटे आता पुण्या – मुंबई सारख्या मेट्रो शहरातही दिसत आहेत. पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरातील सोसायटी आणि कॉलनीतही बिबटे येत आहेत. बिबट्यांच्या या वाढत्या घुसखोरीमुळे नागरी वस्तीत भीतीचे सावट निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात तर सर्रास बिबटे नजरेस पडत आहेत. सध्या ग्रामीण भागात ऊस तोडणी सुरू आहे. उसाच्या शेतात बिबट्यांची पिल्ले सापडत आहेत. ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर नित्याचा बनला आहे. नागरी वस्तीत आणि शेतांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांना पकडण्यासाठी वन विभागाकडून पिंजरे लावण्यात येतात. बिबटे नागरी वस्तीत घुसून पाळीव प्राण्यांचा फडशा पाडत आहे. काही वेळा तर बिबट्यांकडून नागरिकांवर जीवघेणे हल्ले देखील होत आहेत. दौंड, शिरूर या तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात एक महिला व दोन मुलांना जीव गमवावा लागला आहे. दौंड, शिरूर, आंबेगाव, जुन्नर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यात बिबट्यांनी उच्छाद मांडला असून या भागात बिबट्यांची मोठी दहशत निर्माण झाली असून नागरिक भयभीत झाले आहे त्यामुळेच या नरभक्षक बिबट्यांना वन विभागाने ठार करावे अशी मागणी नागरिक करत आहेत अर्थात नरभक्षक बिबट्यांना ठार करणेच योग्य. याआधीही वन विभागाकडून नरभक्षक बिबट्यांना ठार मारण्यात आले आहे. काही वर्षापूर्वी जळगाव जिल्ह्यात एका नरभक्षक बिबट्याने उच्छाद मांडला होता. या नरभक्षक बिबट्याला वन विभागाकडून ठार मारण्यात आले होते. राज्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातही बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे पण बिबट्यांना नागरी वस्तीत घुसखोरी का करावी लागते याचाही विचार आपण करायला हवा. बिबट्यांचा जो नैसर्गिक अधिवास समजला जातो ते जंगल आज राहिले नाही. माणसांनी स्वतःच्या फायद्यासाठी जंगलतोड केली. बिबट्यांना लपण्यासाठी जी झाडे झुडपे होती त्याची कत्तल माणसांनी केली त्यामुळे बिबट्यांना नैसर्गिक अधिवास राहिला नाही. माणसांनी बिबट्यांच्या नैसर्गिक अधिवासात अतिक्रमण केले. माणसांनी बिबट्यांचा निवारा हिसकावून घेतला. माणसानेच आधी बिबट्याच्या निवाऱ्यात घुसखोरी केली त्यामुळे बिबट्याही आता नागरी वस्तीत घुसखोरी करीत आहेत. बिबट्यांनी जर नागरी वस्तीत घुसखोरी करू नये असे आपल्याला वाटत असेल तर बिबट्यांना पुन्हा त्याचा नैसर्गिक अधिवास मिळवून द्यायला हवा. यासाठी वन विभागाने ठोस उपक्रम राबवायला हवेत. जंगलतोड थांबवायला हवी. वृक्षतोड थांबवायला हवी. वन विभागाने वृक्षारोपण मोहीम राबवून ते वृक्ष जगवले पाहिजे. जंगलामध्ये रानावनामध्ये झुडपांची लागवड केली पाहिजे जर बिबट्यांना लपण्यासाठी झाडे झुडपे मिळाली तर ते शेतामध्ये येणार नाहीत. बिबट्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवास मिळाला तर बिबटे नागरी वस्तीत घुसखोरी करणार नाहीत.

## ‘दिलखुलास’ कार्यक्रमात पोलीस अधीक्षक रूपाली अंबुरे यांची मुलाखत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**रस्त्यांवरील अपघात आणि त्यामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी दरवर्षी जानेवारी महिन्यात ’रस्ता सुरक्षा’ मोहीम राबविण्यात येते. यासाठी परिवहन व महामार्ग सुरक्षा विभागामार्फत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात. नागरिकांनी रस्तासुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करून आपले व इतरांचे आयुष्य सुरक्षित ठेवावे, असे आवाहन महामार्ग सुरक्षा विभागाच्या पोलीस अधीक्षक रूपाली अंबुरे यांनी ’दिलखुलास’ कार्यक्रमातून केले आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मिती ’दिलखुलास’ कार्यक्रमात पोलीस अधीक्षक श्रीमती अंबुरे यांची मुलाखत मंगळवार दि. ७, बुधवार दि. ८, गुरूवार दि. ९ आणि शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल पवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. निवेदिका सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे.

रस्ता सुरक्षा ही आपल्या दैनंदिन जीवनातील अतिशय महत्त्वाची बाब आहे. रस्ते अपघात आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्युचे प्रमाण मोठे आहे. ही बाब विचारात घेवून केंद्र सरकार आणि राज्य शासनामार्फत रस्ता सुरक्षा मोहीम राबविण्यात येते. या मोहिमेच्या माध्यमातून रस्ते वाहतूक व महामार्ग रस्त्यांवरील सुरक्षितता सुधारण्यासाठी तसेच लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांनी स्पीडगनचा वापर करून अतिवेगावर नियंत्रण आणणे, हेल्मेटचा वापर करणे तसेच वाहतूक नियमावलीचे पालन करणे इत्यादीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या मोहिमेची राज्यात करण्यात येणारी अंमलबजावणी याबाबत ’दिलखुलास’ कार्यक्रमात पोलीस अधीक्षक श्रीमती अंबुरे यांनी माहिती दिली आहे.

# बोरी येथे मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर

## ➤ माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केली पाहणी
## ➤ सौर ऊर्जेमुळे शेकडो शेतकऱ्यांना लाभ होणार

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर /प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील बोरी येथे मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून माजी आमदार संजय रायमुलकर साहेब यांनी सहा जानेवारी रोजी या प्रकल्पाची पाहणी केली या सौर ऊर्जेमुळे शेकडो शेतकऱ्यांना लाभ होणार असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे वीज पुरवठा



वेळोवेळी खंडित होत असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात अडचण निर्माण होत होती तर वीजपुरवठा वेळी अवेळी सुरू होत असल्याने शेतकरी कमालीचे अडचणीत येत होते याच पार्श्वभूमीवर माजी आमदार संजय रायमुलकर साहेब यांनी त्या वेळचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्याशी वेळोवेळी पाठपुरावा केला व शेतकऱ्यांना नियमित वीज पुरवठा मिळावा यासाठी सतत प्रयत्न केले अखेर बोरी येथे सौर ऊर्जा प्रकल्पाला सुरुवात होऊन सदर काम सध्या प्रगतीपथावर असून लवकरच काम पूर्ण होऊन शेतकऱ्यांना वीज पुरवठा सुरळीत मिळणार आहे यावेळी संतोषराव चनखोरे अनंतराव चनखोरे किशोर पाटील चनखोरे सरपंच अरुण दळवी राजू काटे गुलाबराव बचाटे रवी नरवाडे रमेश बचाटे सुधाकर पाटील बचाटे वामनराव चनखोरे राजू चनखोरे आदी शेतकरी उपस्थित होते.

# नवी मुंबई, नागपूर, शिर्डी विमानतळांची कामे गतीने मुदतीत पूर्ण करावीत- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह नागपूर, शिर्डी विमानतळांची कामे दिलेल्या मुदतीत गतीने पूर्ण करावीत अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित राज्यातील सर्व विमानतळांच्या बांधकाम प्रगतीच्या कामासंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विमान वाहतूक हे सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारला आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करणे फार गरजेचे आहे. देश पाच ट्रीलीयन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत असताना, हे क्षेत्र फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र देशाचे ग्रोथ इंजिन म्हणून काम करत आहे.याक्षेत्रातील बारीक बारीक गोष्टीवर देश आणि राज्याला काम करावे लागणार आहे. या क्षेत्रातील वाढती संख्या विचारात घेऊन पायाभूत सुविधांचा विस्तार करावा लागणार आहे. सोलापूर आणि कोल्हापूर येथे नाईट लँडिंग होईल, असे नियोजन करावे. शिर्डी नाईट लँडिंग सुविधा लगेच सुरू करावे. नागपूर आणि शिर्डी विमानतळाचे अडलेले प्रश्न ३१ मार्चपर्यंत सोडवावे. जळगाव येथे नवीन टर्मिनल इमारत तयार करावे, पुरंदर विमानतळ जागा अधिग्रहण प्रक्रिया लवकर सुरू करावी. पालघर विमानतळ उभारणीसाठी प्रक्रिया सुरू करावी अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, वाढवण बंदर हे केंद्र आणि राज्य सरकारचा महत्त्वाचा प्रकल्प आहे. जगातील सर्वात मोठ्या १० बंदरापैकी एक हे बंदर असणार आहे. देशातील सर्वात मोठी व्यापारी वाहतूक या ठिकाणाहून होणार आहे. याभागातून बुलेट ट्रेन, कोस्टल रोड जाणार आहे. याठिकाणी चौथी मुंबई साकारणार आहे.यासाठी वाढवण येथे तात्काळ नवीन विमानतळाचा निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कामाची चांगली प्रगती असुन अधिक गतीने काम सुरू करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. नवी मुंबई विमानतळ ८५ टक्के पूर्ण झाले आहे. त्याची क्षमता मुंबई विमानतळापेक्षा दुप्पट असणार आहे. कामे गुणवत्तापूर्ण व कालमर्यादेत करण्यासाठी प्रयत्न करावा. अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

नाईट लँडींगची सुविधा असलेल्या विमानतळांविषयी असलेल्या अडचणी सोडवाव्यात. विमानतळांच्या कामांना होत असलेल्या उशिराची कारणे शोधून त्यावर मार्ग काढावा आणि कामे गतीने पूर्ण करावीत, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. यावेळी नवी मुंबई, नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळांविषयी सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यामध्ये झालेले काम, उर्वरित कामासाठी लागणारा कालावधी, प्रलंबित परवानग्या, आर्थिक बाजू, भू–संपादन अशा विविध विषयांचा आढावा घेतला. याबरोबर राज्यातील सर्व विमानतळांचा सादरीकरणाच्या माध्यमातून आढावा घेतला.

यावेळी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या सह सचिव रुबिना अली, असंगबा चुबा एओ, सहसंचालक नयोनिका दत्ता, जे. टी. राधाकृष्ण, प्रादेशिक कार्यकारी, भारतीय विमानतळ प्राधिकरण, पश्र्चिम क्षेत्राचे वरिष्ठ अधिकारी फैज अहमद किडवाई, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे कार्यकारी अधिकारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे कार्यकारी अधिकारी यांच्यासह मुख्यमंत्री सचिवालय तसेच विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, सचिव आदी उपस्थित होते.

## एनडी स्टुडिओच्या अद्ययावतीकरण व्यवसाय वृद्धीसाठी सल्लागार नियुक्त करावा– सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**एन डी स्टुडिओचे अद्ययावतीकरण करुन तेथे चित्रपट निर्मिती व्यवसाय वाढवण्याच्या दृष्टीने त्या क्षेत्रातील तज्ज्ञ सल्लागार नियुक्त करावे. व्यावसायिक कृती आराखडा तयार करुन एनडी स्टुडिओची आर्थिक सक्षमता वाढविण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

मंत्रालयात एनडी स्टुडिओच्या अद्ययावतीकरणाच्या कामासंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी आमदार महेश बालदी, सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांच्यासह फिल्मसिटी तसेच एनडी स्टुडिओचे संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.शेलार म्हणाले की, मराठी निर्माते, कलाकार, तंत्रज्ञ यांना सहाय्यक ठरतील अशा पूरक सुविधा उपलब्ध करुन देण्याची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाची आहे. त्यादृष्टीने एनडी स्टुडिओचे अद्ययावतीकरण हे भविष्यातील मनोरंजन क्षेत्रातील बदल लक्षात घेऊन करण्यात यावे. याचा परिपूर्ण आराखडा निर्मितीसाठी तज्ज्ञ सल्लागारांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. या स्टुडिओच्या माध्यमातून जास्तीत जास्त रोजगार संधी निर्माण करण्यावर भर देताना त्यात स्थानिकांना प्राधान्य द्यावे. या ठिकाणी बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रामुख्याने मराठी सिरियल्स, सिनेमा, वेब सिरीज ओटीटी माध्यमात काम करणाऱ्या निर्माते, कलाकारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशा सूचना मंत्री ॲड. शेलार यांनी दिल्या.













DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### महाराष्ट्र परिचय केंद्र येथे मराठी पत्रकार दिन



नवी दिल्ली , ६ : महाराष्ट्र परिचय केंद्र येथे मराठी पत्रकार दिनानिमित्त प्रभारी उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माहिती अधिकारी अंजु निमसरकर यांच्यासह उपस्थित कर्मचाऱ्यांनीही जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या मराठी आणि इंग्रजी भाषेतील पाक्षिकाची सुरूवात करून मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली. पाश्र्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून 'दर्पण'च्या माध्यमातून बाळशास्त्री जांभेकरांनी समाजात नवीन जीवनमूल्ये रूजविली. त्यांच्या कार्याची आठवण म्हणून ६ जानेवारी हा दिवस 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

### टीम इंडिया अडकली ऑस्ट्रेलियात! ३ दिवसांत सिडनी कसोटी संपल्यानंतर भारतीय संघासोबत नक्की काय घडलं?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर गावसकर ट्रॉफीचा शेवटचा सामना सिडनी येथे खेळला गेला. यजमान ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या दिवशीच हा सामना जिंकून मालिका ३-१ अशी खिशात घातली. टीम इंडियाला १० वर्षानंतर बॉर्डर गावसकर ट्रॉफीमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारताला पराभव पत्करावा लागला आणि सोबतच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनल खेळण्याच्या स्वप्नांचाही चुराडा झाला. सिडनी कसोटी अवघ्या ३ दिवसांत टीम इंडियाला पराभवचा सामना करावा लागला. दरम्यान, भारतीय संघ ऑस्ट्रेलियात अडकली आहे. टीम इंडियाला अद्याप भारतात परतण्याचे तिकीट मिळालेले नाही.

खरंतर, सिडनी कसोटी २ दिवस आधी संपली. त्यामुळे टीम इंडियाला सध्या ऑस्ट्रेलियातच राहावे लागणार आहे. टीम इंडियाचा ऑस्ट्रेलिया दौरा ७ जानेवारीपर्यंत होता. ज्यामुळे सध्या तिकीट मिळण्यास विलंब होत आहे. दुसरीकडे, बीसीसीआय खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठी तिकिटांची व्यवस्था करण्यात व्यस्त आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३ दिवसांत कसोटी संपल्याने भारतीय खेळाडूंना घरी जाण्यासाठी तिकिट मिळवताना पळापळ करावी लागत आहे. नियोजित तारखेनुसार टीम इंडियाला ८ जानेवारीला फ्लाइट घ्यायचे होते. परंतु सिडनी सामना २ दिवस आधी संपल्यामुळे काही खेळाडू लवकर निघू शकले असते, पण त्यांना तिकिटे मिळाले नाही.

सिडनी कसोटीत टीम इंडियाला ६ विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला होता. त्यामुळे टीम इंडिया वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलच्या शर्यतीतूनही बाहेर पडली. टीम इंडिया थढउ फायनलमधून बाहेर पडण्याची ही पहिलीच वेळ आहे. याआधी दोन्ही वेळा भारतीय संघ डब्ल्यूटीसी फायनल खेळला होता, मात्र दोन्ही वेळा टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला होता. यावेळी डब्ल्यूटीसीचा अंतिम सामना दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणार आहे. दक्षिण आफ्रिकेने प्रथमच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

### 'इमरजन्सी'चा नवा ट्रेलर रिलीज ! हा मराठी अभिनेता करतोय काम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या एकामागोमाग एक जबरदस्त चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालताना पाहायला मिळत आहेत. पुष्पा २ चित्रपट कोट्यवधींची कामाई केली. पुष्पा २ नंतर आलेल्या चित्रपटांनंतरही पुष्पाची क्रेझ कायम आहे. अशातच आता माजी पंतप्रधान इंदिरा गांधीनी २५ जून १९७५ मध्ये देशावर लादलेल्या आणिबाणीवर आधारित असलेल्या 'इमरजन्सी' चित्रपटाचा दुसरा ट्रेलर रिलीज झाला आहे.



अनेक अडथळ्यांनंतर या चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाकडून ग्रीन सिग्नल मिळाला आहे. या चित्रपटाचा पहिला ट्रेलर २०२४ मध्ये स्वातंर्त्य दिनी रिलीज केला होता. यानंतर अनेकांनी या चित्रपटावर टीका केली. तसेच या चित्रपटावर बंदी घालण्यात यावी, यासाठी अनेकांनी प्रयत्न देखील केले होते.

चित्रपटाचे दिग्दर्शन अभिनेत्री कंगना राणौतने केले असून या चित्रपटातील इंदिरा गांधींची भूमिका सुद्धा कंगनाने केली आहे. तर अनुपम खेर हे जयप्रकाश नारायण यांच्या भूमिकेत दिसून येत आहे. रिलीज केलेल्या दुसऱ्या ट्रेलरमध्ये अनुपम खेर तुरुंगातून तत्कालीन पंतप्रधानांना पत्र लिहिताना यात दिसतात. या चित्रपटात मराठी अभिनेता श्रेयस तळपदेने सुद्धा काम केले आहे.

हा चित्रपट येत्या १७ तारखेला रिलीज होणार असून कंगनाचे इतर चित्रपट ९ वर्षापासून बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरत आहे. आता कंगना सोबतच तिच्या चाहत्यांचे सुद्धा १७ तारखेकडे डोळे लागले आहे.

# पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा बिबी येथे ठिकठिकाणी सत्कार सोहळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी मोठ्या उत्साहात ६ जानेवारी रोजी पत्रकार दिन साजरा केला यावेळी बिबि येथे ठिकठिकाणी पत्रकाराचा सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये बिबी येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे सर्व प्रथम आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.

त्या नंतर ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच पुत्र दिपक गुलमोहर सचिव अमोल मोरे व तसेच सर्व ग्रामपंचायत चे सर्व सदस्य यांनी सर्व पत्रकारांचा मानसन्मान करून पेन डायरी देऊन







सत्कार केला यावेळी त्यानंतर सचिव अमोल मोरे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला त्यानंतर बिबी पोलीस स्टेशन, मातोश्री अर्बन, राजश्री शाहू अर्बन, मध्ये सुद्धा पत्रकाराचा मान सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील यांनी सुद्धा पत्रकारांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या यावेळी प्रामुख्याने ज्येष्ठ पत्रकार मधुकर मोहिते, राजकुमार मुळे, काशिनाथ राऊत, भागवत आटोळे, देवानंद सानप, रमेश खंडागळे, ऋषी दंदाले ,कृष्णा पंधे, रामप्रसाद जाधव, मिलन चव्हाण, ब्रह्मानंद वाकोडे, रोशन चव्हाण, शीलवंत इंगळे, सय्यद जहीर ,अशोक मुंढे, वितेश चव्हाण, सुनिल इंगळे, दिनकर काकड, काशिनाथ काळे, गजानन डोईजड, उपस्थित होते

## पर्यटन वाढीसाठी पायाभूत सुविधांचा विकास करावा- पर्यटनमंत्री शंभूराज देसाई



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील पर्यटनाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास व पर्यटन उपक्रमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी त्याच बरोबर आगामी शंभर दिवसात राबविण्यात येणा-या उपक्रमांवर भर द्यावा असे निर्देश पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आज मंत्रालयात झाली. यावेळी पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पर्यटन सचिव जयश्री भोज, पर्यटन संचालक डॉ बी एन पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी यांसह अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. देसाई म्हणाले की, देशातंर्गत व आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्यातील पर्यटन वाढावे यासाठी गाव ते राज्यस्तरापर्यंत जिथे पर्यटनस्थळांचा विकास केला जात आहे त्याची प्रत्येक जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती मागवून पर्यटन विकासासाठी सर्वसमावेशक धोरण राबवावे, नवीन पर्यटन धोरण, पर्यटन संचालनालयाकडे वर्ग करण्यात आलेली कामे, पर्यटन स्थळांची वर्गवारी, प्रसिद्धी उपक्रम, कृषी पर्यटन धोरण, साहसी पर्यटन धोरण, कॅरॅव्हॅन धोरण,बीच शॅक धोरण इत्यादी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करावी.

पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत हे लक्षात घेता पर्यटन वाढीसाठी पर्यटन धोरण २०२४ ची प्रभावी अंमलबजावणी करणे, विविध पर्यटन धोरण, पर्यटन संचालनालयामार्फत सुरू असलेले उपक्रम, प्रादेशिक पर्यटन विकास आराखडे, केंद्र शासनाच्या मदतीने सुरू असलेले प्रकल्प यांना गती देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यातील प्रत्येक विभाग व हंगामानुसार विविध महोत्सवांचे नियोजनूर्पवक आयोजन करणे. जिथे पर्यटन वाढू शकते अशा ठिकाण शोधून अशा पर्यटनस्थळांचा विकास करणे यावर पर्यटन विभागाने भर द्यावा. सुरक्षित आणि जबाबदार पर्यटनावर आधारित पर्यटन उपक्रम राबवावा, असेही मंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

## सोनू निगमच्या आवाजात मराठमोळी मेजवामनी; सुमधुर सुरांनी सजलेलं 'चंद्रिका'प्रेक्षकांच्या भेटीला

**मुंबई/प्रतिनिधी :** सोनू निगमनं आपल्या आवाजानं अनेकांच्या काळजाचा ठाव घेतला आहे. आजही सोनू आपल्या गाण्यांनी अनेकांच्या मनावर अधिराज्य गाजवतो. सोनू निगमच्या आवाजाची जादू प्रत्येकाच्या मनावर होते. अनेक भाषांमधून सोनू निगमनं पार्श्वगायन केलं आहे. आतापर्यंत सोनू निगमनं भरपूर गाण्यांना आपला आवाज दिला आहे. पण यंदा नव्या वर्षाची सुरुवात सोनू निगमनं एका मराठमोळ्या गाण्यानं केली आहे. सुबोध भावे दिग्दर्शित आणि शंकर एहसान लॉय यांनी संगीतबद्ध केलेला, आगामी मराठी चित्रपट 'संगीत मानापमान' या चित्रपटातलं गाणं 'चंद्रिका' सोनू निगम यांनी आपल्या सुमधूर आवाजानं गायलं आहे, जे आज प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे.

## वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहे.

ग्रंथालय संचालनालयांतर्गत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबईच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत समूह वाचन, ग्रंथप्रदर्शन, वाचन कौशल्य कार्यशाळा, ग्रंथपरिक्षण व कथन, व्यवसाय मार्गदर्शन, वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, ग्रंथालय उपसंचालक श्री.काकड, यंग लेडीज हायस्कूलच्या शिक्षिका उषा वर्मा, सुजाता महाजन, वर्षा शिंदे यांच्यासह विद्यार्थीनी, इतर वाचक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. ग्रंथपाल शालिनी इंगोले यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे व विद्यार्थ्यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी वाचन कार्यशाळेचे उद्घाटन करून वाचनाचे महत्व सांगून कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या.

कार्यशाळेचे प्रमुख वक्ते प्रा. शामकुमार पां. देशमुख, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांनी मार्गदर्शन केले. वाचन म्हणजे काय, त्याचे फायदे, काय वाचावे? वाचण्याच्या विविध पद्धतीचे सविस्तर विवेचन केले. वाचनाने मनाची ताकद, आकलन क्षमता, वैचारीक पातळी वाढते. वाचनाचे मुलभूत अंग या प्रसंगी विशद करण्यात आले. वाचनाचे चार स्तर असून प्रत्येक स्तरावर आपल्या वैचारीक पातळीत बदल होतो. वाचनाची सवय लावण्यासाठी दररोज आवडीच्या विषयावर किमान २० मिनिटे वाचन करण्याचे स्वत:ला बंधन घातले पाहिजे असेही त्यांनी उपस्थित वाचक आणि विद्यार्थ्यांना सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन योगेश बिर्जे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई यांनी केले.

## उद्योग, व्यवसाय व आस्थापनांनी मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र ३१ जानेवारी पर्यंत सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासन, विविध आस्थापना व त्यांचे अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, महापालिका, तसेच खासगी क्षेत्रातील आस्थापनांनी त्यांच्याकडील मनुष्यबळाचे तिमाही विवरणपत्र येत्या ३१ जानेवारी पर्यंत सादर करावे, असे आवाहन मुंबई शहर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त अ. मु. पवार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

दर तिमाहीअखेर (मार्च, जून, सप्टेंबर, डिसेंबर) विवरण सादर करणे बंधनकारक आहे. पंचवीस किंवा अधिक लोक काम करतात अशा सर्व आस्थापना, उद्योग, व्यापार कारखाने यांना सेवायोजन कार्यालये यांनी रिक्तपदे अधिसूचित करण्याची सक्ती करणारा कायदा १९५९ व अंतर्गत नियमावली १९६० नुसार मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच ज्या उद्योजकांनी महास्वयंम वेबपोर्टलवर नोंदणी केलेली नाही त्या उद्योजकांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी. हे विवरणपत्र (ER-I) ऑनलाईन पध्दतीने https://rojgar.mahaswaym.gov.in या वेबपोर्टलवर सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सुविधेचा वापर करुन ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत विवरणपत्र (ईआर-१) सादर करावे,

मुंबई शहर जिल्हा अंतर्गत येणारे सर्व नियोक्ते, आस्थापना यांनी https://rojgar.mahaswaym.gov.in या वेबपोर्टलवर तिमाही विवरणपत्र ईआर १ सादर करण्याची दक्षता घ्यावी. या वेबसाइटच्या एम्प्लॉयर (List a Job ) या टॅबवर क्लिक करुन एम्प्लॉयर लॉगइनमध्ये युजर आयडी व पासवर्ड वापरून लॉगइन करावे आणि ईआर रिपोर्टमध्ये ईआर -१ या ऑप्शनवर क्लिक करुन तिमाही विवरणपत्र ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहिती , मार्गदर्शन अथवा तांत्रिक अडचण असल्यास mumbaicity.employmentgmail.com या ईमेलवर संपर्क करावा. ३१ डिसेंबर, २०२४ च्या तिमाही अखेर हजेरी पटावर असलेल्या सर्व मनुष्यबळाच्या माहितीचे विवरणपत्र ईआर ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत महास्वयम वेबसाईटवर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे. हे विवरणपत्र ऑफलाईन स्विकारले जाणार नाही, असे सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर यांनी कळविले आहे.

## मुंबई महानगर क्षेत्रात 'केबल कार' प्रकल्पाचा मानस- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रस्ते वाहतूक, रेल्वे तसेच मेट्रो यासारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवरील वाढता ताण लक्षात घेता भविष्यात 'केबल कार' सेवा विकसित होणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे सर्वेक्षण करून विकास आराखडा (उझ्मठ) तयार करणे गरजेचे आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या भेटी दरम्यान या प्रकल्पाच्या सादरीकरणाद्वारे मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दृष्टीने या प्रकल्पाची आवश्यकता मांडण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

नवी दिल्ली येथे ७ जानेवारी रोजी होणाऱ्या 'विकसित भारत २०४७' या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या लक्ष्य प्राप्तीच्या दृष्टीने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सर्व राज्यांच्या परिवहन मंत्र्यांच्या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित राहणार आहेत.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन सादरीकरणानंतर मुंबई महानगर क्षेत्रामध्ये 'केबल कार' प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकारद्वारे 'पर्वतमाला परियोजना' अंतर्गत सार्वजनिक खासगी भागीदारी (झझझ) अथवा केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त आर्थिक भागिदारीने रोप वे विकसित करण्याचा मानस असून यासंदर्भातील विकास आराखडा तयार करुन तत्वत: मान्यता घेण्याचा प्रयत्न राहील, असेही मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले.



मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्यादृष्टीने या प्रकल्पाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पालघर पासून रायगड जिल्ह्यातील उरण-पेणपर्यंत पसरलेल्या एकूण क्षेत्रामध्ये नागरिकरणाचा वेग वाढत आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील वाढते नागरीकरण, वाहनांची वाढती संख्या, नवीन रस्ते व रेल्वे सेवा, प्रदूषण याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन आधुनिक तंत्रज्ञान व पाश्र्चात देशातील यशस्वी नाविन्यपूर्ण प्रकल्पाचा अभ्यास करून वाहतूक समस्या सोडवण्यासाठी ठोस प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

मुंबई महानगरास प्राप्त झालेले महत्त्वपूर्ण भौगोलिक स्थान, सागरी किनारा खाडीचा प्रदेश, एलिफंटासारखी प्राचीन लेणी, माथेरानसारखे थंड हवेचे पर्यटन स्थळ, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, तुंगारेश्र्वर वन्यजीव अभयारण्यासारखी हरित चादर जतन करून मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी 'रोपवे'च्या माध्यमातून 'केबल कार' प्रकल्प राबवणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

## विविध वृत्त...

### २३ वर्षीय दिपाली चित्तेला भोसकलं, तरुणीच्या मृत्यूने महाराष्ट्र हादरला

दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** गेल्या दोन-तीन माहिन्यात महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या दुर्घटना राज्यात घडल्या आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील नंदुरबार तालुक्यातील मलोनी भागात किरकोळ कारणावरुन एका २३ वर्षीय तरुणीवर चाकू हल्ला करण्यात आला, ज्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या तरुणीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर आदिवासी समाज आक्रमक झाला आहे.

दिपाली चित्ते असे २३ वर्षीय मृत झालेल्या आदिवासी तरुणीचं नाव आहे. शहादा तालुक्यातील आक्रमक आदिवासी समाजाने आता शहर बंदची हाक दिली आहे. आज सकाळपासून शहादा शहरात व्यापाऱ्यांची सर्व दुकाने बंद केली आहे. तरुणीच्या मृत्युनंतर जिल्ह्यात मोठा वाद पेटण्याची शक्यता आहे. या प्रकरणी शहादा पोलीसात गुन्हा दाखल असून दोन आरोपींना अटक करण्यात आले आहे. यासोबत शहादा शहरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### शिर्डीत गाड्यांनी भिकारी आणले जातात, नशेखोरांमुळे गुन्हेगारी वाढतेय; संजय शिरसाटांचे सुजय विखेंना समर्थन

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** शिर्डी संस्थानच्या मोफत जेवणामुळे राज्यभरातील भिकारी शिर्डीत जमा झालेत या माजी खासदार सुजय विखे वक्तव्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. मात्र सुरुवातीला सुजय विखेंच्या वक्तव्यावर टीका करणारे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी आता सुजय विखेंच्या वक्तव्याचं समर्थन केल्याचं दिसून येतंय. सुजय विखेंनी आपल्याशी चर्चा करून हा विषय समजावून सांगितला, आपला गैरसमज झाला असं संजय शिरसाट यांनी सांगितलं. राज्यभरातील भिकारी शिर्डीत आणले जातात आणि त्यातील काही नशेखोर असल्याचं वक्तव्यही संजय शिरसाट यांनी केलं.

संजय शिरसाट म्हणाले की, सुजय विखेंनी भिकाऱ्यांसबंधी जे वक्तव्य केलं त्याला मी सुरुवातीला विरोध केला. मात्र सुजय विखे यांनी माझ्याशी चर्चा केल्यानंतर तो विषय स्पष्ट झाला. काही भिक्षेकरू हे शिर्डीत गाड्यांनी आणले जातात. त्यातील काही नशेखोर आहेत. ते व्हाईटनरची नशा करतात. अशा लोकांमुळे गुन्हेगारी वाढते आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. खरं तर पोलिसांनी याकडे लक्ष द्यायला हवे.


# ह्युमन मेटान्यूमो व्हायरस संदर्भात मार्गदर्शक सूचना जाहीर

## नागरिकांनी घाबरुन न जाता सूचनाचे पालन करावे - जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** चीनमध्ये ह्युमन मेटान्यूमो व्हायरसचा उद्रेक होत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्र्वभूमीवर प्रशासन अर्लट मोडवर असून आरोग्य विभागाने दक्षता घेत पूर्वनियोजन करावे. तसेच आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे नागरिकांनी पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात चीनमध्ये उद्रेक होत असलेल्या मानवी मेटान्यूमो व्हायरस संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




डॉ. पाटील म्हणाले की, सध्या चीनमध्ये ह्युमन मेटान्यूमो व्हायरस (Human Metapneumovirus) उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. ह्युमन मेटान्यूमोव्हायरस(क्ष्मचत) तीव्र श्र्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने जाहिर केलेल्या मार्गदर्शक सूचनाचे पालन केल्यास घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. एचपीएमव्हीच्या पार्श्र्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क असून जिल्ह्यात पुरेशा प्रमाणात औषध साठा, ऑक्सिजन साठा, खाटांची संख्या उपलब्ध आहे. आवश्यकता भासल्यास अधिक खाटांचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच सर्वेक्षणाचे कार्य अधिक गतिमान करुन सर्दी-खोकला अर्थात आयएलआय, सारी रुग्णांचे जलद सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आरोग्य विभागांने देण्यात आले आहे.

मानवी मेटान्यूमो व्हायरस Human Metapneumovirus (HPMV) सर्वप्रथम नेदरलँडस मध्ये २००१ मध्ये आढळला. मानवी मेटान्यूमो व्हायरस(एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्र्वसन विषाणू आहे. ज्यामुळे श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो. या अनुषंगाने डीजीएचएस आणि एनसीडीसी दिल्ली संचालक यांनी मार्गदर्शक सूचना जाहीर केले आहे. यामध्ये खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्र्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये ? या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.



**काय करावे**

जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाकावे. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवावे. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहावे, भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक अन्नाचे सेवन करावे. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्यावी.

**काय करू नये**

हस्तांदोलन, टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर, आजारी लोकांशी जवळचा संपर्क, डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध घेणे टाळावे.

लक्षणे:- सर्दी, ताप, खोकला, शिंका येणे, डोकेदुखी, थकवा हि या आजाराची सर्वसामान्य लक्षणे आहेत. संशयित असलेल्या व्यक्तीचे आजाराचे निदान करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक येथे आरटीपीसीआर, टिजेन नोजल टेस्ट, सीटी स्कॅन व एक्स-रे ह्या तपासण्या उपलब्ध आहेत.

महाराष्ट्रात आतापर्यंत एचएमपीव्हीचा एकही रुग्ण आढळलेला नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. तरी सर्व नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून श्र्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये ? या संदर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

या आजाराची कोणतीही लक्षणे आढळल्यास किंवा काही संशय असल्यास नागरिकांनी घाबरून न जाता त्वरित जवळच्या आरोग्य संस्थामध्ये डॉक्टरांशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.

### ‘आपलं सरकार’ वेब पोर्टल आता सक्षम आणि नव्या स्वरूपात

# ‘आपलं सरकार’ॲप तयार करावे

## माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या ४८५ सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देणारे आपलं सरकार (१.०) वेब पोर्टल अधिक सक्षम, अद्ययावत करुन नव्या स्वरूपात तयार करावे. त्याचबरोबर नागरिकांना जलद माहिती उपलब्ध होण्यासाठी आपलं सरकारचे 'ॲप' तयार करुन या सुविधा मोबाईलवर उपलब्ध होतील या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांनी दिले.



मंत्रालय येथे माहिती तंत्रज्ञान विभागाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटीया, राष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेच्या संचालक सपना कपूर, महा आयटीचे प्रकल्प अधिकारी राहुल सुर्वे, महा आयटीचे प्रकल्प अधिकारी किरण पाटील यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, आपलं सरकार ही वेबसाईट अपग्रेड करुन नव तंत्रज्ञानाचा वापर करुन वेबसाईट नव्या स्वरूपात तयार करण्यात यावी. नागरिकांना जलद सुविधा उपलब्ध होतील, तसेच कोणत्याही सेवा सुविधेसाठी अर्ज करताना वेबसाईट वापरण्याची पध्दत सुलभ असायला हवी, अधिक क्षमतेचा रॅम वापरून चॅट बॉट सारख्या सुविधांसह ए आय चा वापर करुन त्या वेबसाईट वापरण्यास सुलभ बनवाव्यात. तसेच आपलं सरकारचे एक प तयार करुन सुविधा पवरुन उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

महाराष्ट्र शासनाच्या ४८५ सेवा नागरिकांना आपलं सरकार वेबसाईटच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. अन्य राज्यांचा यासंदर्भातील अभ्यास करुन महाराष्ट्र शासनाच्या ४८५ व्यतिरिक्त २८५ अधिकच्या नवीन सेवा ऑनलाईन देण्याची तयारी केली असून लवकरच या सुविधा उपलब्ध होतील. यावर महाराष्ट्र शासनाचे विविध विभाग आणि महा आयटी कंपनी काम करीत आहे. या सेवा कार्यान्वित झाल्यानंतर ७७० सेवा ऑनलाईन देणारे महाराष्ट्र हे देशातील ऑनलाईन सेवा देणाऱ्या पहिल्या पाच राज्यांमध्ये येईल. या दृष्टीने विभागाने तयारी सुरु केली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

केंद्र सरकारने डेटा सुरक्षेसाठी तयार केलेल्या कायद्यानुसार राज्याचा स्टेट ओन क्लाउड तयार करण्याचे निर्देशही ॲड. शेलार यांनी दिले.

# आनंददायी शिक्षणाद्वारे राज्याचा लौकिक वाढवावा- शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :शिक्षणसंस्थेचे यश व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देण्यात संस्थाचालकांची भूमिका अत्यंत मोलाची राहणार आहे. यासाठी संस्था चालकांनी या शिक्षण पद्धतीत सक्रिय सहभाग घेऊन शिक्षण क्षेत्रात राज्याचा लौकिक निर्माण करण्यास पुढे यावे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.



गुणवत्तापूर्ण, आनंददायी शिक्षण पद्धती या विषयावर नामांकित शिक्षण संस्था आणि शैक्षणिक संस्थांच्या मान्यताप्राप्त संघटनांचे प्रतिनिधींचे चर्चासत्र यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आले.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले की, सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे आहे. देशाची आदर्श भावी पिढी घडविण्यासाठी शिक्षणसंस्था शिक्षण प्रसाराचे काम अविरतपणे करत आहेत. यापुढे कौशल्य व तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देण्यावर भर द्यावा. संस्थेत शैक्षणिक वातावरण अधिक पोषक ठेवण्यात संस्थाचालकांची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे शिक्षण संस्थांनी आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धतीत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करावेत.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले की, शालेय शिक्षण विभागाचा कृतिवर अधिक भर असल्याने शिक्षण संस्थेच्या चांगल्या कामास, उपक्रमास सहकार्य केले जाईल. शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ, संस्थाचालक यांच्या अनुभवाचा लाभ घेऊन शिक्षण विभागाचे काम समन्वयाने पुढे नेऊया. शिक्षण संस्थांच्या मागण्याबाबत शालेय शिक्षण विभाग नेहमीच सकारात्मक आहे.

चर्चासत्रात संस्थाचालक व संघटनेच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या शिक्षक भरती, संच मान्यता, पवित्र पोर्टल, ११ वी प्रवेश प्रक्रिया, रोस्टर तपासणी, जुनी पेन्शन, सेवा ज्येष्ठता, अशैक्षणिक कामे यासंदर्भातील मुद्यांचा प्राधान्याने विचार केला जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

चर्चासत्रास आमदार ज्ञानेश्र्वर म्हात्रे, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी, महेश पालकर, बालभारतीचे के.बी. पाटील आणि शिक्षण संस्था चालक व शैक्षणिक संस्थांच्या मान्यताप्राप्त संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी आमदार ज्ञानेश्र्वर म्हात्रे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना आज जिल्हा माहिती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

आचार्य जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले दर्पण नावाचे नियतकालीक सुरू केले. त्यानिमित्ताने दर्पण दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो. यावेळी माहिती सहायक सतिश बगमारे, वरिष्ठ लिपीक प्रतिक फुलाडी, जयंत वानखडे, श्रेया दाभाडकर, लिपीक सौरभ बढिये, प्रमोद राठोड, नामदेव गट्टे, राम पाटील यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

